**Vagdhara: A Multilingual Peer Reviewed Research Journal**
Vol. 1 No. 2 (2026): January-March; Website: https://vagdhara.in/index.php

# महत्तम समतेचा बंदखोर प्रवक्ता : संत कबीर

* डॉ. रणवीर सुमेध भगवान

*सहायक प्रोफेसर, मराठी विभाग, विश्वभारती विश्वविद्यालय, शांतिनिकेतन, प.बं., 731235

इमेल-sumedhbhau@gmail.com, मो. ९४७५८४९८५४

*Received: February 28, 2026* *Accepted: March 30, 2026*

शोध सार

*तथागत बुद्ध चार्वाक लोकायत, सांख्य, जैन अशा दर्शनाने भारतीय दर्शनशास्त्रातला जडवादी विचार विकसित झाला आहे. मध्यकालात निर्णय भक्तीच्या माध्यमातून याच तत्वज्ञानाला नवे आयाम देण्याचे कार्य संत कबीरांनी केले आहे. कबीर नव्याने जन्माला येत आहे. बाजार बदल मात्र तो अधिक दक्ष आहे शोषणाच्या मेथडालॉजीच्या संदर्भात परंतु कबीर तर आजही बाजारालाच उभे आहे मानवतेच जागरण घालण्यासाठी, माणुसकीचे क्षितिज अधिक विस्तारण्यासाठी. एकूणच समतामूलक विज्ञानाधिष्ठित समष्टीच स्वप्न आणि त्यासाठी लढे जोपर्यंत जिवंत व सुखी आहेत तो पर्यंत कबीर काल्पनिक व काळाच्याही पुढे जावून प्रासंगिक आहेत.*

**बीज शब्द :** मध्यकाल, लोकायत, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, वर्णजाती, समतामुलक विचारांना.

तथागत बुद्ध चार्वाक लोकायत, सांख्य, जैन अशा दर्शनाने भारतीय दर्शनशास्त्रातला जडवादी विचार विकसित झाला आहे. मध्यकालात निर्णय भक्तीच्या माध्यमातून याच तत्वज्ञानाला नवे आयाम देण्याचे कार्य संत कबीरांनी केले आहे. मानव निर्मित विषमता, वर्ण जातिभेद, जन्मजात श्रेष्ठत्वाचा अंहकार, पाप-पुण्यांच्या खुळचट कल्पना, अंधश्रद्धा, धर्माच्या नावाने चाललेली खुली लुट, लुटारूंची आत्ममुग्धता आणि लुटल्या जाणाऱ्यांच्या जगण्यातील परस्पर अंतर्विरोध यांच्या विरोधात उत्तर भारताना मुळर झालेली पहिली विद्रोही स्वर संत कबीरांचा आहे.

कबीरपूर्व व कबीरोत्तर कालात असंख्य संत व संप्रदाय आपणास पहावयास मिळतात. महाराष्ट्रात महानुभाव-वारकरी-नाथ-समर्थ असे काही परस्पर पुरक तर काही परस्पर विसंगत जाणीवा घेऊन काही संप्रदाय उदयास

आले होते तद्वत् दक्षिण भारतात महात्मा बसवेश्वरांचा लिंगायत संप्रदाय, केरळत नाराण गुरु, बंगालमध्ये चैतन्यमहाप्रभू तथा लालन फकीर, ओरिसात संत भीम भोई इत्यादी संत आपणास पहावयास मिळतात. उत्तर भारतात कबीर, नानक, रविदास, जायसी, निजामुद्दीन इत्यादी संतांच्या रूपात ही परंपरा विकसित होताना दिसते.

मध्यकाल हा सर्वार्थाने (धर्म व राजकारण) अराजकेचा काल होतो. या सार्वत्रिक अराजकेच्या पार्श्वभूमीवर एका मयदिन उभ राहिलेले हे संतांचे बंध भक्ती नावाच्या प्लॅटफॉर्मवर उभे दिसते, कारण त्या शिवाय अभिव्यक्तीचा दुसरा कोणताही सक्षम पर्याय तत्कालीन समष्टीपुढे नव्हता. धार्मिक रुढी-परंपराच्या नावाखाली चालणारे निरंतर शोषण व जुलमी राजवटींद्वारे होणारे भौतिक शोषण या धार्मिक व राजसत्ता प्रदत्त शोषणांच्या पार्श्वभूमीवर हिंदीप्रदेशात या विरोधात पहिला नकाराचा आणि शोषणमुक्तीचा सजग विचार संत कबीरांद्वारे प्रस्फुरित होताना दिसतो. 'कबीर' हा मूळतः फारशी शब्द आहे त्याचा अर्थ 'महान' असा होतो. १४ शतकातल्या साक्षात धार्मिक अंहकाराच्या गंडस्थळात म्हणजेच काशीसारख्या ठिकाणी एक विणकराच्या मुलाचे नाव 'कबीर' ठेवणे हा ही मोठा आश्चर्यकारक प्रकार आहे.

ज्या आंदोलनावर आपण भक्तीचा-गुढ-रहस्यतेचा गोंडस मुखवटा चढवतो वास्तविकपणे ते आंदोलन मानवमुक्तीच,सामाजिक न्यायाचे आंदोलन होते.प्रत्येक आंदोलनाला आणि विचारव्युहाला अपरिहार्यपणे काळाच्या मर्यादा असतात आणि याच काळाच्या मर्यादा मध्यकाळात 'भक्ती' नावाच्या माध्यमातून अवतरित होताना दिसतात.मध्यकाळात संपूर्ण देशात आध्यात्मिक मुक्तीचा विचार मांडत रचना लिहिणारे,प्रथमच बोलु पहाणारे संत काही अपवाद वगळता समाजातल्या खालच्या स्तरातून उदयास आले होते.

हिंदु-मुस्लिम उभयतातील कर्मकांड-अंधश्रद्धा यासोबतच मनुस्मृती प्रणित सामाजिक व्यवस्था व जुलमी राजसत्ता या चक्रव्यूहात संपूर्ण देश बंधिर झाला होता.राजसत्ता आणि धर्मसत्ता लुट्टिचा उत्सव राजरोसपणे साजरा करित होते कबीर या दोन्ही व्यवस्थांच्या बुडाला सुरंग लावून शोषणमुक्तमानवतेच, मानसाच्या विमूळतेचे आभाळभर होणार गीत गातो, वेद-पुराण-स्मृती-कर्मकांड-मंदिर-मठ-मस्जिद-पुजारी-मुल्ला-काजी या सर्वांना कबीर एकच वेळी आह्वान देतात आणि तर्क कठोर शास्त्रांच्या मारानी शास्त्र गारद करतात. मनुस्मृतीच्या अजयी सांप्रदाय्याला व सोबतच राजाश्रय प्राप्त धर्मांधतेला एकच वेळी उद्धाटने आह्वान देणारे मध्यकालातील प्रथम विद्रोही संत कबीर होत.

तर्क कठोर वैज्ञानिक मीमांसा, सामाजिक न्यायाचा आग्रह आणि महत्तम समतेचा विचार यांचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा अपरिहार्यपणे आपणास बुद्ध, कबीर, म. फुले, यांचे नाव घ्यावे लागते कारण या महापुरुषांनी प्राचीन-मध्य-आणि आधुनिक काळात शोषणमुक्त समाजाची रूपेणा आखून दिली होती. भारतीय राज्यघटनेचे

शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तथागत बुद्ध आणि महात्मा फुले यांच्या सोबतच संत कबीराना आपले गुरु मानले आहे. राज्यघटनेच्या प्रस्ताविकेतील स्वातंत्र्य-समतेचा आणि बंधुत्वाचा विचार म्हणूनच बुद्ध, कबीर व म. फुले साहेबांशी नाते सांगताना दिसते.

सहाशे वर्षांपूर्वी घटनाप्रदत्त मूलभूत अधिकार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मागमूस देखील नसताना संत कबीर पिसाट धर्मांधतेशी, कर्मकांडाच्या रखवालदारीशी, मठ-मस्जिदित बावराण्या आणि शोषणव्यवस्थेत आंकड डुबलेल्यांच्या विरोधात आग आग ओकत होते. प्रगाढ साहसाने वेद-पुराण-आणि धर्मशास्त्रा नाकारून पंडितांच्या वेदमंत्रा आणि काजी-मुल्लांच्या अज्ञानमध्ये तो विवंचनेतला हतबल झालेला माणूस शोधत होता. ब्राह्मणी आणि मुस्लिम धर्मवेडेपणावर, धर्माच्या नावाखाली चाललेल्या भ्रमकपणावर कबीर जेव्हा हळू चढवतात तेव्हा ते बचावाच्या कोणत्याच जागा शिल्पक ठेवत नाहीत. हे पराकोटीच टोकदारपण फक्त त्याच व्यक्तीकडून शक्य आहे ज्यांचे व्यवस्थेत कुठलेच हितासंबंध नाहीत. म्हणूनच कबीर म्हणतात.

कबीर खड़ा बाजार में लिये लुगाटी हात ।

जो घर जलाये अपना, वह चले हमारे साथ ॥

सत कबीर ज्या बाजारात उभे होते तो बाजार धमाधत आणि अनिबंध लुटंचा आहे. कल्पकल्पाने कतलखाण्याकडे चाललेल्या मुक्क्या जनावरागत जगण्या सामान्य माणसांच्या अभिलाषेचा, बाजार आहे. हा बाजार दक्षिणा आणि कंदुरिच्या माफक दरात जन्नती स्वप्न विकणाऱ्या आहे या सोबत हा बाजार श्रेष्ठत्वाचा अंहकार म्हणून गळ्यात जाणवे घालून तृषार्थ होणाऱ्यांची आहे. कबीर या बाजारात उभा आहे तो या बाजाराचा होण्यासाठी नव्हे किंवा मांडवली करणाऱ्यासाठी नव्हे तर एका सुनियंत्रित शोषणाला धमाच्या नावाने विकणाऱ्यांना धडा शिकविण्यासाठी. वेदशाखांची राजधानी अर्थात काशी याच काशीला कबीरसारख्या एखादा विचार वेदांच्या सर्वज्ञ पणाला सर्वसमावेशकतेचा प्रश्न विचारून वेदना नकार देत “सबार उरप मानुस सत उबार किहु नाही” या नव्या मूल्याची उद्घोषणा करतो.

व्यक्तीप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्याच्या पलिकडे जावून साक्षात अनुभवातून आलेला सजगपणा कबीर देह्यातून मांडतात कबीर म्हणतात “तू कहता कागज की लेखी में कहता आंखन देखी” अथवा “कबीर पढिबा दूरी करि किताब देई बहाई ” महणत कबीर शुद्ध प्रार्थना आणि अडीच अक्षरी प्रमाच तत्वज्ञान नव्याने मांडतात.

नव्या मूल्यांची,नव्या समाजाची पुनर्स्थापना करू पाहणार्या कोणत्याही सामाजिक क्रांतीकारकान्स किंवा चिंतकान्स नकाराच शक्श बेमुरतपणे चालवाव लागत पणतु हे नकार शक्श एकांगी असेल तर अल्पवाधीतच निष्फळ होते.कबीरांनी चालवलेल्या नकार शक्शाला नवनिर्माणचे ,स्वीकाराहतेवे,शोषणमुक्त समाजाच्या स्वप्नाचे तेज आहे.युरोपियन इतिहासातल्या 'कुसेडरची' जी भूमिका आहे ती भूमिका भारतीय इतिहासातल्या मध्यकाळात कबीर अदा करतांना दिसतात.तर्कथिष्ठित सद्दसद्विवेक बुद्धी,व मानण्याचा आपार कळवळा घेवून कबीर वैचारिक आजारपण अमलेल्या समाजमनाच अचूक निदान करित होते महणूनच कडव्या नकाराचा समाजस्वास्थसाठी त्यांनी बेमालूम वापर केला होता.

वर्णजाती-वर्णजाती आणि लिंग सापेक्ष भेदांची जाणीव व शोषणाच व्यापकत्व याच भान मध्यकाळात कबीरा इतक दुसऱ्या कोणत्याच संतात जाणवत नाही.' माया तु महाठगणी हम ज्ञानी ' या प्रकारच्या काही दोह्यांना आधार बनवून संत कबीरांना आरोपित्या पिंजऱ्यात उभ करण्याचा भीमपराक्रम अलिकडच्या काळात काही तथाकथित स्त्रीवादी लेखिकांकडून होत आहे.कबीरांनी आपल्या अमंरत्व दोह्यात,स्त्रीत स्त्री शोषण व स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न प्रखरपणे मांडला आहे.भक्ती नावाच्या तात्कालिक मर्यादित व्यासपीठावर स्त्रीयांचा प्रश्न जेव्हा कबीर उपस्थित करतात तेव्हा तो स्त्रीयांच्या आध्यात्मिक मुक्तीच्या आकांक्षेशी व धार्मिक स्वातंत्र्याशी निगडित असतो.अडीज हजार वर्षापूर्वी तथगत बुद्धांनी भिक्षुसंघात स्त्रियांना प्रवेश देउन गाँयनाकस्त्रीचा दिपस्तंभ उंचावला होता पण नंतरच्या काळात मात्र 'न स्त्री स्वातंत्र्यमहती' चाच जबरदस्त जयघोष होतांना दिसतो. 'न स्त्री स्वातंत्र्यमहती' ते 'पापाचे प्रवेशद्वार' या,या युगातील जाणीवातून स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न कबीरापर्यंत येउन पोहचतो.

हिंदु-मुस्लिम दोन्ही धर्मातील पंडित दर्शवतांना कबीर धर्माभिमान सौंदर्याचा सहाय्य देतात ते म्हणतात “ झुटे गर्व भूला मती कोई, हिंदु तुर्क झुट कुल दोई” किंवा “ किंतम मुस्लिम अवर जनेउ हिंदु तुर्क न जाणे। भेजो तु तुर्क तुर्किन का जाया, तो गर्भ नी काहे सुनति कर आया ” संत कबीर म्हणतात जर निर्मात्याने हिंदु-मुस्लिम धर्म निर्मिले तर आईच्या गर्भातच का मुलां झाली नाही आणि लेकरांना गर्भातच का यज्ञोपवित घातले नाही. यज्ञोपवित आणि मुलां या दोन्ही बनावटी असल्याचे ठामपणे कबीर सांगतात. धार्मिक क्षेत्रात स्त्रीच्या घोषीत बंदीच्या संदर्भात देखील कबीर म्हणतात “ जो तु बामन बामनी का जाया तो अउर राह काहे नही आया । बामन होय के जनेपहिरि तो महरी को क्या पहनाया। वो जन्म की भूदणी पक्के तुम पाण्डे क्यों न्वाया ।” संत कबीर म्हणतात जर यज्ञोपवित जरब्राह्मण्याची शर्त व खूण आहे तर ब्राह्मण क्षियांवरंतर यज्ञपवित्र घालण्याची परवानगी नाही म्हणजेच त्या शूद्र आहेत तर मग त्या शूद्र क्षीर्या हातचे अन्न का ग्रहण करता?

'सब ही की नचावत राम गुसाईं' या पेशा थोडक्स वेगळ कबीर म्हणतात 'समर्थ को नहीं दोष गुसाईं' सामर्थ्यान् व्यक्तीला आणि समाजाला कुणीच दोष देत नाही,त्याच्या शोषणाच्या विरोधात कोणीच उभे रहात नाही परंतु कबीर मात्र सामर्थ्यवान लोकांच्या सीवत नाहीत ते हतबल-अगतिक-विंचनेच्या भवसागरात अडकलेल्यांच्या बाजूला उभे आहेत.धर्माच्या नावाने चालणार्या रुढी-परंपरा-अंधश्रद्धा,माणसांच निरंतर अवमूल्यन करणाऱ्या विरुद्ध कबीर डोळसपणे अनुभवतात म्हणूनच त्यांच्या शब्दांचे शक्ती अचूकपणे व्यवस्थेचे मर्मस्थान भेदताना दिसतात.

वारकरी सांप्रदायात संतत्रैष्ठ तुकोबा जन्म सामान्य रंजल्या-गांजल्या जनांचा कैंवार घेण्यासाठी शब्दांना शक्तांसारखे परजतात तद्द्वत्वं संत कबीर देखील सार्वजनिक शोषणामुळे हतबल झालेल्या समुहांचा,त्यांच्या रोजच्या जीवन संघर्षाचा-भावआवेगांचा,त्यांच्या इच्छांचा प्रवक्ता बनतो.वारकरी सांप्रदायात संत तुकोबा आणि हिंदी प्रदेशात संत कबीर सीडलेतर लोकजाणीवा आणि लोकभावनेच्या इतक्या जवळ गेलेला कोणी दिसत नाही.महाशे वर्षापूर्वी कबीर तेव्हा तटस्थ राहून,अलिस राहून सगळ्यांचं भल इच्छीत होते त्या वेळी तथाकथित गोस्वामी तुलसीदास म्हणत होता " ढोल,गंवार,शुद्र पशु नारी । यह सब ताडन के अधिकारीपुजिये विप्र शील गुण हीना । पुजिये न शुद्र गुन ग्यान प्रवीणा " किंवा " अधम जाती मे विद्या पाये,भय हुं यथा अहि साप दुध पिलाये" या वक्तुन लक्ष्मण येते की कबीरांच्या विचारांना शह देण्याचा कार्यक्रम त्यांच्याच काळात सुनियोजितपणे सुरू होता.कबीरांच्या समतामुलक विचारांना छेद देण्यासाठी तुलसीदास लिहित आहे अशी जाणीव ठावी इतपत संदर्भ तुलसीदासांच्या रचनेत सापडतात.आज ही वर्ष जात्यांचा अंहकार जपणाऱ्याचा आवडता कवी तुलसीदासच असतो हे समीकरण आज महाशे वर्षानंतरही कायमआहे.

वर्ण-जात्यांचे, क्षत्रियांच्या अर्थात एकूणच मानव मुक्तीचे आंदोलन गेली अडीच हजार वर्षे अनेक आवर्तात सुरू आहे. थोड्याफार स्तरावर बदल झालेले तर शोषणाचे राक्षस मात्र कायम आहे. कारण या व्यवस्थेने वर्णजात्यांत, क्षत्रियत्व व सार्वत्रिक गुलामीच्या विरोधात उभ्या राहणाऱ्या महापुरुषांचे वैदिक अलायनमेंट (समेट) करून त्यांना फक्त पुतळे आणि स्मारकपुस्तक मर्यादित कक्षांच्या कमालीचे कौशल्य विकसित केले आहे. जिथे थेट विचारांचा सामना उघडपणे करणे शक्य नाही तिथे छुपा शिककाव करून, कधी अनुयायी बनून विचारांमध्ये भेसळ करायची संबंध आंदोलनाची तथा विचारव्युहाची दिशाच बदलून टाकायची ही मोड्स ऑपरेटी गेली हजारो वर्षे नजाकतीने वापरली जात आहे.

संत कबीरांच्या संदर्भात ही हेच घडल आहे. त्यांच्या चरित्राला गुढ-रहस्यमय बनविण्यासाठी चमत्कार तथा अनेक कल्पित कथा जोडल्या गेल्या, त्यांच्या चरित्रात रामानुजाचार्य घुसडवले गेले, बंडखोर कबीराला कबीरदास

बनवत दशरथी रामाच्या भजनी लावल्या गेल्या. एकूणच विचारातील उग्र क्रांतीकारकता संपवून व्यवस्थेच्या पिरॅमिडला धक्का न लावणारा रामभक्त कबीर योजनाबद्ध पद्धतीने पुढे आणला गेला, जन मनावर बिंबला गेला. मठ-मंदिर-मस्जिद-पंडित-काजी-मुल्ला-मौलवी या समस्त यंत्रणेला टोकाच्या विरोध करणाऱ्या कबीरांची उत्तर भारतात असंख्य मठ बनवून त्यांच्या तत्त्वज्ञानाला व लक्ष्यालाच तिलाजली दिली गेली आहे. कबीर व रामानुजाचार्यांच्या संदर्भात विचार केलास लक्षात येते की ह्याच ब्राह्मण गुरुत्वा भंपक कथांच्या अनेक महापुरुषांच्या बाबतीत पुढे आल्या आहेत. व्यवस्थेच्या विरोधात लढणाऱ्या महापुरुषांचे गुरु ब्राह्मण आहेत म्हटले की माणसांना थेट जनावर बनविण्याच्या व्यवस्थेचे चक्र गतीमान ठेवता येते. यामुळेच इतिहासातले विवाद आजही अराजकतेचे कारण बनत आहेत.

संत कबीरांचे दोहे, साकी यांचा अभ्यास केल्यावर लक्षात येते की या रचना संत कबीरांच्या जगण्यावरून व जगण्यातल्या निरंतर चाललेल्या संघर्षावरून श्रद्धेचा परिपक्व आहेत. कबीरांच्या विचारात्यूहाच्या केंद्रस्थानी सामान्य माणूस आहे जो एहिक आणि परमार्थिक दोन्ही बाजूंनी भरडला गेलाय. कबीरांचा कठवठा त्यांच्या वाणीतला कडवटपणा त्या सामान्य माणसाशी असलेल्या प्रतिबद्धतेचा व निष्ठेचा परिपक्व आहे.

लोकमानसाचा अचूक अंदाज होता म्हणूनच कबीर प्रचलित लोकधरणीच्या विरोधात जावून प्रबोधनपर्वाची मशाल पेटवतात. त्यांचे दोहे व भाषा 'श्रावार्थ' करणान्या पंडितांसाठी किंवा 'काव्य-शास्त्र विनोदाचे' खेळ करणारंसाठी नव्हते. त्यांनी प्रबोधनासाठी वापरलेली भाषा लोकभाषा वस्त्यावरच्या माणशांनी थेट जोडून घेणारी भाषा वापरली व त्या माध्यमातून लोकमनावर संस्कार केले.

सुमारि सहारे वर्षपूर्वी संत कबीराने व्यवस्थेला अनुलक्षून ते प्रश्न उभे केले त्या प्रश्नांची उत्तर २९ त्या शतकात तरी मिळतील का ? या प्रश्नाचा विचार करताना लक्षात येते की आपण कबीरांच्या पुढे सहारे वर्ष अस्पृश्यपेशा सहारे वर्ष पाठीमागे गेलो आहेत. कारण वर्णजाती श्रेष्ठत्वाचा अहंकार, भेदाभेद, कर्मकांड, अंधश्रद्धा, पराकोटीचा धार्मिक उन्माद, जगण्यातला भंपकपणा, उदार तत्वज्ञान व व्यवहारातला प्रचंड अंतर्विरोध आजही पूर्वीपेक्षा अधिक भयावह झाला आहे. कबीराला संपविण्यापूर्वी किमान काही प्रश्न विचारून व्यवस्थेला नागड करणाऱच तर्नी स्वातंत्र्य मिळाल होत आज प्रश्न विचारणे म्हणजे स्वतःला संपवून घेण्याचे परमिट काढल्यासारखे होऊन बसले आहे. आज तर्काधिष्ठित विवेकाने लिहणे-बोलणे, विचार मांडणे दुर्लक्षित होऊन बसले आहे. या दशकातव्यवस्थेच्या विरोधात विचार मांडल्याची किंमत मलाळा, अभिजित राय, दाभोलकर, कॉ. पानसरे, प्रा. कुलबुर्गी यांनी चुकती केली आहे. इतिहास संपल्याच्या फुकिमाच्या घटनेवेळी इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे. कबीर नव्याने जन्माला येत आहे. बाजार बदल मात्र तो अधिक दक्ष आहे शोषणाच्या मेथडालॉजीच्या संदर्भात परंतु कबीर तर आजही

बाजारालाच उभे आहे मानवतेच जागरण घालण्यासाठी, माणुसकीचे क्षितिज अधिक विस्तारण्यासाठी. एकूणच समतामूलक विज्ञानाधिष्ठित समष्टीच स्वप्न आणि त्यासाठी लढे जोपर्यंत जिवंत व सुखी आहेत तो पर्यंत कबीर काल्पनिक व काळाच्याही पुढे जावून प्रासंगिक आहेत.

■■■